## VINAYAK DAMODAR SAVARKAR'S POEM:

## HINDUNRUSIMHA[1]

### TRANSLATION BY ANURUPA CINAR

हे हिंदुशक्ति- संभूत-दीप्ततम-तेजा
हे हिंदुतपस्या-पूत ईश्वरी ओजा
हे हिंदुश्री-सौभाग्य-भूतिच्या साजा
हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा
करि हिंदुराष्ट्र हें तूतें । वंदना
करि अंतःकरणज तुज अभि-नंदना
तव चरणिं भक्तिच्या चर्चा चंदना
गूढाशा पुरवीं त्या न कथूं शकतो ज्या
हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजीराजा !

हा भग्न तट असे गडागडाचा आजी
हा मग्न आज जयदुर्ग आंसवांमाजी
हि भवानिची ह्या पुन्हा गंजली धारा
ती म्हणुनि भवानी दे न कुणा आधारा
गड कोट जंजिरे सारे । भंगले
जाहलीं राजधान्यांचीं । जंगलें
परदास्य-पराभविं सारीं । मंगलें
या जगतिं जगूं ही आज गमतसे लज्जा
हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजीराजा

जी शुद्धि हृदयाची रामदासशिर डुलवी
जी बुद्धि पांच शाहींस शत्रूच्या झुलवी
जी युक्ति कूटनीतींत खलांसी बुडवी
जी शक्ति बलोन्मत्तास पदतलीं तुडवीं

ती शुद्धि हेतुची कर्मी । राहु दे
ती बुद्धि भाबड्या जीवां । लाहुं दे
ती शक्ति शोणितामाजी । वाहुं दे
दे पुन्हा मंत्र तो दिलें समर्थें तुज ज्या
हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजीराजा !

Hail, You of Glowing Splendour, Might of Hindus O,
Divine brilliance blessed by Hindu penance so!
You prosperous Hindu destiny nonpareil,
O Godlike Shivajiraja, Hindu-Nrusimha incarnate, hail!

This Hindu nation bows to you O
Heart and soul we applaud you, so
With chandan we anoint you, lo!
Ye who fulfilled our unspoken yearnings,
O God-like Shivajiraja, Hindu-Nrusimha incarnate, hail!

Every fort rampart is in ruins frayed,
Jayadurga is with tears sprayed.
Rusted once more is the Bhavani blade,
What wonder then, she withdraws her aid.

Every fort and coastal stronghold, wrecked!
Every capital city, wilderness unchecked!
Enslaved fortune in foreign coil, necked!

Living in these ignominious times, oh shame!
O God-like Shivajiraja, Hindu-Nrusimha incarnate, hail!

Acclaimed by Ramdas: purity of heart yours,
Routed the five Shahi enemy: intellect yours,
Your strategy that so many villains razed
Your strength that vanquished a tyrant crazed

May that purity of purpose sustain!
May our simple souls that intellect obtain!
May such strength in our blood reign,

Grant us the mantra that Ramdas gave, do
O God-like Shivajiraja, Hindu-Nrusimha incarnate, hail!

---

[1] Nrusimha (नृसिंह; Nṛsiṃha): known primarily as the 'Great Protector' who specifically defends and protects his devotees in times of need.
Also known as Narasimha (Sanskrit: नरसिंह; Narasiṃha,) Narasingh, Narsingh and Narasingha; he is an avatar of the Hindu god Vishnu and one of Hinduism's most popular deities, as evidenced in early epics, iconography, and temple and festival worship for over a millennium. Narasimha is often visualized as half-man/half-lion, having a human-like torso and lower body, with a lion-like face and claws.